*This Question Paper contains 16 printed pages.*
*(Part - A & Part - B)*

Sl.No. 0101543

| |
|---|
| પ્રશ્ન પેપરનો સેટ નંબર જેની સામેનું વર્તુળ **OMR** શીટમાં ઘટ્ટ કરવાનું રહે છે. |
| **Set No. of Question Paper circle against which is to be darken in OMR sheet.** |
| **01** |

# 03(M)

**(MARCH, 2018)**
**(New Course)**

Day 1

**Part - A : Time : 1 Hour / Marks : 50**
**Part - B : Time : 2 Hours / Marks : 50**

## (Part - A)

***Time : 1 Hour]*** ***[Maximum Marks : 50***

**सूचना :**

1) दिलेल्या प्रश्न पत्रिकेत **Part - A** मध्ये वस्तुनिष्ठ प्रकारचे एकून **50** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न आवश्यक आहे.
2) प्रश्नांची क्रम संख्या 1 ते 50 आहे. प्रत्येक प्रश्नाला 1 गुण आहेत.
3) प्रश्न पत्रिका ठिक पद्धतीने वाचने आणि योग्य पर्याय / विकल्प लिहा.
4) आपल्याला वेगळे दिलेले **O.M.R.** शिट मध्ये प्रश्नाच्या समोर **(A) O, (B) O, (C) O** आणि **(D) O** दिले आहे. ज्या प्रश्नाचे उत्तर योग्य आहे, ते विकल्पास गोलाकारा पेनने पूर्ण घट्ट (●) करायचे आहे.
5) दिलेल्या प्रश्नपत्रिकेत वरच्या उजव्या बाजूस प्रश्न पत्र शीट नंबरला **O.M.R.** शीट मध्ये उपलब्ध स्तंभ (कॉलम) मध्ये लिहा.

### गद्य - विभाग

1) श्रीचक्रधरस्वामीच्या बालपणातील आठवणी संग्रहीत केलेला ग्रंथ कोणत्या नावाने ओळखला जातो?
   (A) लीळाचरित्र
   (B) आत्मचरित्र
   (C) संतचरित्र
   (D) या पैकी नाही

2) अरण्यातील सागवानादी वृक्ष कोणाच्या परवानगीने तोडून न्यावेत?
   (A) पोलीस
   (B) हुजुर
   (C) जंगलखाते
   (D) रयत

3) कीर्तनकार बुवांचा मुक्काम कोणाकडे होता?

(A) पुरंदरे

(B) श्रीमंत

(C) नारो आप्पाजी

(D) थोर सरदार

4) पगार होताच रामुने वहिणी जवळ काय मागितले?

(A) पेढे

(B) लाडू

(C) जिलेबी

(D) फरसाण

5) संत गाडगेबाबांनी कोणत्या यज्ञाचा प्रारंभ केला?

(A) ज्ञानयज्ञ

(B) कर्मयज्ञ

(C) धर्मयज्ञ

(D) स्वच्छतायज्ञ

6) मारूतराया ही कथा कोणत्या कथा संग्रहातून घेण्यात आली आहे?

(A) जांभळाचे दिवस

(B) गावाकडच्या गोष्टी

(C) काळी आई

(D) माणदेशी माणसे

7) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना इंग्रजांनी काळ्या पाण्याची शिक्षा किती वर्षाची सुनावली होती?

(A) पाच वर्ष (B) पन्नास वर्ष

(C) दहा वर्ष (D) सात वर्ष

8) श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनी बडोदा शहरातील तलावास कोणते नांव दिले?

(A) सुरसागर (B) आनंदसागर

(C) आजवा सरोवर (D) सयाजी सरोवर

9) बिनपैशांचे खेळ या पाठातील लेखक श्री दिलीप वि. चित्रे हे बडोद्यात कुठे राहत होते?

(A) कादवेकर वाड्यात

(B) चांदोरकर वाड्यात

(C) गडकऱ्यांच्या वाड्यात

(D) जोशींच्या वाड्यात

10) छात्रालयातील आठवणी या पाठातील लेखक आनंद यादव पास व्हावेत म्हणुन त्यांच्या आई वडिलांनी कोणत्या देवास नवस केला होता?

(A) नरसोबाच्या वाडीच्या दत्ताला

(B) पुंढरपुरच्या विठ्ठलाला

(C) हनुमंताला

(D) थेऊरच्या गणपतीला

11) पमीच्या भावाने नाटकवाल्या विजय जोशीला झटकन कोणत्या नाटकाचे नांव सांगितले?

(A) रायगडाला जेव्हा जाग येते

(B) वाहतो दुर्वाची जुडी

(C) उभा जन्म उन्हात

(D) बटाट्याची चाळ

12) महाराष्ट्राच्या माहेरवाशिणीचे गौराई या पाठात लेखीका इरावती कर्वेनी कोणते प्रतिक सांगितले आहे ?

(A) लक्ष्मी

(B) सरस्वती

(C) गौरी

(D) सिता

13) 'गच्चीवरील बाग' या पाठाचे लेखक निळू दामले यांनी वनस्पती शास्त्राचा अभ्यास केव्हा सुरू केला ?

(A) चार वर्षापूर्वी

(B) आठ वर्षापूर्वी

(C) बारा वर्षापूर्वी

(D) दहा वर्षापूर्वी

14) 'माझ्या संस्कृतची कथा' या पाठाच्या लेखिका कोण आहेत ?

(A) सरोजिनी बाबर

(B) कुमुद पावडे

(C) स्मिता भागवत

(D) अरूण ढेरे

15) गुप्तनिवासात राहायला आल्यापासुन ॲनच्या अन्नपदार्थाची काय होत आहेत ?

(A) परीक्षण

(B) यादी

(C) आवर्तने

(D) विक्रि

## पद्य – विभाग

16) 'विराणी' या कवितेचे कवी कोण आहेत ?

(A) संत तुकाराम
(B) संत ज्ञानेश्वर
(C) संत बहिणाबाई
(D) संत नामदेव

17) संत ज्ञानेश्वरांचे मूळ गाव कोणते ?

(A) आळंदी
(B) देहू
(C) आपेगाव
(D) पंढरपूर

18) 'दुपार' या कवितेतील सासुरवाशिण दुपारच्या भर उन्हात सुन काय करीत आहे ?

(A) नदीवर पाणी भरत आहे
(B) आंघोळ करीत आहे
(C) विश्रांती घेत आहे
(D) नदीवर धुण धूत आहे

19) परिश्रमांच्या जोरावर कुष्ठरोग्यां सारख्या उपेक्षित रूग्णांनाही हाताशी धरून कोणी आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविले ?

(A) बाबा आमटे
(B) नारायण सुर्वे
(C) निळू दामले
(D) मधुसुदन कालेलकर

20) ज्या काळात कुष्ठरोगा विषयी घृणेची भावना होती. त्या काळात कोणत्या जिल्ह्यात माडिया गौड आदिवासी जमातीसाठी बाबा आमटे यांनी लोकबिरादरी प्रकल्प उभारला ?

(A) भंडारा
(B) गडचिरोली
(C) गोंदिया
(D) चंद्रपूर

21) 'माझ्या कवितेची चव' या कवितेचे कवी इंद्रजित भालेराव यांना आपल्या कवितेला कसला सुगंध पसरावा असे वाटते?

(A) निसर्गाचा

(B) काळासावळा

(C) मातीवानी शेणामातीचा

(D) फुलांचा

22) कवी इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेने काट्याकुट्यात काय जतन करावी?

(A) हिरवळ

(B) चव

(C) भाषा

(D) गोडवा

23) 'भारतीय जवानाचे पत्र' या कवितेतील जवानांच्या घरासमोर कश्याचे झाड आहे?

(A) पिंपळाचे

(B) चिंचचे

(C) वडाचे

(D) अंब्याचे

24) भारतीय जवान देशाच्या रक्षणासाठी कोठे उभा आहे?

(A) सह्याद्री पर्वतावर

(B) हिंदकूश पर्वतावर

(C) हिमगीरी पर्वतावर

(D) हिमालय पर्वतावर

25) संस्कृतीचा घोष कोण करतात?

(A) अज्ञानी लोक

(B) दांभीक लोक

(C) लोकांचे शोषण करणारे

(D) अधर्मीय लोक

26) जमाखर्च स्वातंत्र्याचा या कवितेचे कवी मंगेश पाडगांवकर कष्ट करून कश्याचे मळे पिकवील?

(A) श्रमाचे (B) मानवतेचे

(C) कष्टाचे (D) धान्याचे

27) 'श्रावणझड' या कवितेचे कवी अनिल यांचे खरे नाव काय आहे?

(A) आत्माराम रावजी देशपांडे

(B) आचार्य अत्रे

(C) वि. वा. शिरवाडकर

(D) ना. सी. फडके

28) 'श्रावणझड' या कवितेचा काव्य प्रकार कोणता?

(A) सप्तपदी (B) दशपदी

(C) नवपदी (D) अष्टपदी

29) पूर्वीच्या काळात नदीचे पाणी कसे असायचे?

(A) स्वच्छ निर्मळ (B) घाणेरडे

(C) अपवित्र (D) रोगट

30) पूर्वी आजी कशी पवित्र होत असे?

(A) दर एकादशीला स्नान करून

(B) दर अमावस्येला स्नान करून

(C) दर पोर्णिमेला स्नान करून

(D) या पैकी नाही

## व्याकरण - विभाग

31) खालील पैकी शुद्ध शब्द ओळखा?

(A) सर्वज्ञ
(B) विसअंगत
(C) विश्रान्त
(D) दुराआवा

32) खालील पैकी अशुद्ध शब्द ओळखा.

(A) अविभाज्य
(B) परिर्वतन
(C) स्वच्छतायज्ञ
(D) मठआधीश

33) खालील पैकी उद्गारार्थी वाक्य ओळखा.

(A) मी नेहमी लवकरच उठतो.
(B) बाप रे ! किती चिडतो तु !
(C) एवढे चिडणे चांगले नाही
(D) विद्यार्थ्याला कष्ट केल्याशिवाय यश मिळेल का?

34) 'ते दृष्य पाहून मी अतिशय घाबरलो' या वाक्याचा प्रकार ओळखा.

(A) विधानार्थी
(B) होकारार्थी
(C) प्रश्नार्थी
(D) नकारार्थी

35) खालील पैकी केवल वाक्य ओळखा?

(A) आम्ही घराबाहेर पडलो आणि पावसाला सुरूवात झाली.
(B) जी माणसे आळशी असतात, ती आयुष्यात काहीही चांगले काम करू शकत नाहीत.
(C) तुम्ही चहा किंवा कॉफी घ्या.
(D) मला ताप आला आहे म्हणून मी शाळेत जाणार नाही.

36) जी माणसे आळशी असतात, ती आयुष्यात काहीही चांगले काम करू शकत नाहीत. या वाक्याचा प्रकार ओळखा.

(A) मिश्रवाक्य

(B) केवलवाक्य

(C) संयुक्त वाक्य

(D) प्रश्नार्थी वाक्य

37) 'शुद्धोदक' या समासाचा प्रकार ओळखा.

(A) द्वंद समास

(B) अव्ययीभाव समास

(C) कर्मधाराय समास

(D) तत्पुरूष समास

38) खालील पैकी नत्रतत्पुरूष या समासाचे उदाहरण कोणते.

(A) असभ्य

(B) गुणसंपन्न

(C) सुकन्या

(D) घरदार

39) 'सीतेचे मुख चंद्रा सारखे आहे' या उदाहरणातील अलंकार ओळखा.

(A) श्लेष

(B) अनुप्रास

(C) उपमा

(D) रूपक

40) 'यमक' अलंकाराचे उदाहरण ओळखा.

(A) हे मंद मंद पद सुंदर कुंददंती

(B) पोटात भुकेची आग भडकली होती

(C) चतुर नव्हे तर अभ्रकी पंखांचे ते विमान उडे तेथे

(D) नागीण धावते जणुं रोषाने

41) 'सदा सर्वदा देव सन्नीध आहे' हे कोणत्या वृत्ताचे उदाहरण आहे.

(A) मालिनी

(B) पृथ्वी

(C) भुजंगप्रयात

(D) वसंततिलका

42) खालील पैकी मालिनी वृत्ताचे उदाहरण ओळखा.

(A) अनुदिनी अनुतापे तापलो रामराया.

(B) निघे दंडका राम कोदंडपाणी.

(C) जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे.

(D) प्रभाते मनी राम चिंतीत जावा.

43) 'सेवा करणे हीच भावना असणारे' या शब्दसमुहासाठी एक शब्द द्या.

(A) देशद्रोही

(B) क्रांतीकारक

(C) हुतात्मा

(D) सेवाभावी

44) 'हुतात्मा' या सामासिक शब्दाचा विग्रह ओळखा.

(A) देशाचा विश्वासघात करणारा

(B) देशासाठी आपल्या जीवनाचे बलिदान देणारा

(C) क्रांती करणारे

(D) राजकीय कारणांसाठी ज्यांना कैद केले जाते असे कैदी

45) 'संघर्ष करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

(A) आत्मविश्वास ढळणे.

(B) मनातले बोलणे.

(C) कठिण परिस्थितीशी सामना करणे.

(D) अडचणीत सापडणे.

46) 'खूप प्रयत्न करणे' या अर्थासाठी वाक्प्रचार शोधा.

(A) प्रयत्नांची पराकाष्ठा करणे

(B) प्रबोधन करणे

(C) अनोमा करणे

(D) सुतराम शक्यता नसणे

47) 'जमिन' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.

(A) जननी

(B) जलद

(C) गगन

(D) भूमी

48) 'स्वदेशी' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द शोधा.

(A) खान्देश

(B) विदेशी

(C) स्वदेश

(D) हिंदूस्थान

49) 'दावले' या ग्रामीण शब्दाचा मराठीत प्रचलीत अर्थ शोधा.

(A) दाखवले

(B) ईचार

(C) ठावं

(D) सोभाव

50) 'चाणाक्ष' या शब्दाचा अर्थ सांगा.

(A) मठ्ठ

(B) भित्रा

(C) भोळा

(D) चतुर

# 03(M)

(MARCH, 2018)

(New Course)

## (Part - B)

*Time : 2 Hours]* *[Maximum Marks : 50*

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) प्रश्नपत्रिकेत **Part - B** मध्ये चार विभाग आहेत आणि एकूण **1** ते **13** प्रश्न आहेत.
3) सर्व प्रश्न आवश्यक आहेत. या मध्ये पर्याय दिले आहेत.
4) उजव्या बाजूला प्रश्नाचे गुण दिले आहेत.
5) नविन विभाग नव्या पानावर लिहावे.
6) प्रश्नाचे उत्तर क्रमानुसार द्यावे.

### विभाग - अ

■ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा:** [4]

1) स्वामी गायींना घेऊन निघाले त्यावेळी ब्राह्मणाने काय – काय सुचना दिल्या?

किंवा

आरमारासाठी आंबे, फणस इत्यादी झाडांचा उपयोग का करू नये?

■ **खालील प्रश्नांची दोन – तीन वाक्यात उत्तरे लिहा:** [4]

2) संत गाडगेबाबा स्वच्छतेला ईश्वरोपासना का म्हणतात?

3) श्रीमंत सयाजीराव महाराजांनी कलांचे महत्त्व ओळखून ती कशी जोपासली?

किंवा

लेखक निळू दामले यांनी वनस्पतीशी संबंधित कोण – कोणत्या विज्ञान शाखांचा उल्लेख केला आहे?

■ **खालील प्रश्नांची आठ – दहा वाक्यात मुद्देसूद उत्तरे लिहा:** [3]

4) संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या विराणीमधुन भक्ताची मन:स्थिती कशी व्यक्त झाली आहे ते लिहा.

किंवा

'श्रावणझड' या कवितेच्या आधारे श्रावणातल्या – पावसाचे वर्णन करा?

■ **खालील प्रश्नांची दोन – तीन वाक्यात उत्तरे लिहाः** [4]

5) 'सुखेच माझी मला बोचती' असे बाबा आमटे का म्हणतात?

6) नदीमध्ये बगळे काय काय करतात?

किंवा

सह्याद्रीच्या गौरायांचे वैशिष्ट्ये कोणते?

**विभाग - ब**

■ **खालील अपठित परिच्छेद वाचून त्याचा एक तृतीयांश (1/3) भागात सारांश लिहा व त्यास योग्य शीर्षक द्या?** [5]

7) श्रीसमर्थ रामदासस्वामी व छत्रपती श्री शिवाजी महाराज हे दोन युगपुरूष एकाच वेळी महाराष्ट्राच्या भूमीमध्ये मानवता धर्माच्या उन्नयन कार्यासाठी अवतरले, हा फार मोठा विलक्षण योगायोग आहे प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वदेशप्रेम असावे स्वधर्माच्या रक्षणासाठी प्रत्येकाने निष्ठेने उभे रहावे आणि हे करत असतांना प्रत्येकाने आपल्या स्वदेवाचे स्मरण व जाणीव सांभाळावी या भूमिकेतून हे कार्य समाजात उभे करण्यासाठी या दोन्ही थोर विभूतींनी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले वास्तविकपणे या प्रकारचे कार्य आपल्या देशात व्हावे ही काळाचीच गरज होती.

आपल्या देशाच्या संस्कृतीचा प्राचीन काळापासुन दैदीप्यमान इतिहास आहे आपल्या येथे मनुष्याने संस्कारसंपन्न, बलसंपन्न, नीतिसंपन्न, चारित्र्यसंपन्न, मंगलमय जीवन जगावे असा आदिकाळापासुन आग्रह धरण्यात आलेला आहे आणि अशी जीवन प्रणाली. जगण्याचा कयक्षसुद्धा बाळगलेला आहे या गौरवशाली जीवन जगू शकतो आपल्या जीवनाची सार्थकता करू शकतो ही आपल्या देशातील संस्कृतीची पूर्वापार चालत आलेली धारणा आहे मात्र जसजशी युगे बदलली तसतसा मनुष्याच्या विचारसरणीमध्ये बदल घडत गेला.

■ **खालील पैकी कोणत्याही एका विषयावर कल्पनाविस्तार लिहा.** [5]

8) अ) हे विश्वचि माझे घर

ब) थांबला तो संपला

## विभाग - क

9) एस्. एस्. सी. झाल्यावर तुम्ही काय करणार आहात हे तुमच्या वडिलांना पत्राने कळवा. [5]
पत्ता : 'श्रीदत्त प्रसाद' बंगला,
कारेलीबाग बडोदा
दि.
सूचना :– पत्रात तुमचे नाव, पत्ता किंवा सहीचा उल्लेख करू नये.

10) तुमच्या विद्यालयात प्रमुख पाहुण्याच्या उपस्थितीत 5 सप्टेंबर शिक्षक दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला त्या कार्यक्रमाचा अहवाल लिहा. [5]

## विभाग - ड

11) खालील अपठित गद्य उतारावाचुन दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. [3]

जातीने मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो हा विचार सर्व संत. महंतांनी आणि विचारवंतांनी पुसून टाकण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. सतांचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्याच्या मनात समता नाही आणि ममताही नाही त्याला संतत्वाच्या आणि देवत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार लाभणार नाही तोच खरा अस्पृश्य समजावा ही विशाल आणि सर्व समावेशक दृष्टी संतांच्या साहित्यातून प्रकट झाली आहे भेदाभेद भ्रम अमंगळ आणि जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत हा उदात्त विचार तर्कशुद्ध आहे. आपल्या खांद्यावर जातीय उच्चनीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे. ते फेकून दिले पाहिजे. हे अनेक संतांनी गर्जुन सांगितले आहे परोपरीने सांगितले आहे पण माणसाचा मुर्दाडपणा अलौकीक आहे. संतांच्या कपाळावर त्याने जाती वर्णाची लेबले तत्परतेने आणि धुर्तपणे चिकटविली खरे तर साधूंचीच काय सर्व. सामान्यांचीही जात माणूसच असते माणूसच असावी. माणसांची जाती वाढावी मानव्याची उंची वाढत जावी हे संतांचे स्वप्न आहे पण हे घडत नाही म्हणून संतांच्या वाणीला अनेक वेळा हुंदके फुटलेले आहेत.

प्रश्न :–
अ) संत महंतांनी कोणता प्रयत्न केला?
ब) संत साहित्यातील उदात्त विचार कोणता?
क) संत वाणीला अनेक हुंदके का फुटले?

12) खालील अपठित कविता वाचुन दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. [4]

ते देशासाठी लढले
ते अमर हुतात्मे झाले
सोडिले सर्व घरदार
त्यागिला मधूर संसार
ज्योतीसम जीवन जगले
ते देशासाठी लढले
तो तुरूंग ते उपवास
सोसला किती वनवास
कुणि फासावरती चढले
ते देशासाठी लढले

झगडली झुंजली जनता
मग स्वतंत्र झाली माता
हिमशिखरी ध्वज फडफडले
ते देशासाठी लढले
हा राष्ट्रध्वज साक्षीला
करू आपण वंदन त्याला
जयगीत गाउया अपुले
ते देशासाठी लढले.

प्रश्न :–

अ) देशासाठी लढणाऱ्यांनी कोण त्याग केला?

ब) ते कोणासारखे जीवन जगले?

क) त्यांनी काय काय सोसले?

ड) आपली 'माता' स्वतंत्र केव्हा झाली?

■ खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 शब्दात निबंध लिहा. [8]

13) अ) आजकालचे शिक्षण आणि बेकारी.

मुद्दे:– शालान्त परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांवर बेकारीची गदा —— महाविद्यालयात प्रवेश कठीण —— शाळेतून शिकविले जाणारे विषय देशाची गरज —— लायक नोकरवर्ग नाही —— व बेकारी वाढत आहे —— अशी दुरावस्था —— शिक्षणाने व्यवसाय मिळविणे कठीण —— औद्योगिकीकरण व यांत्रिकीकरण यांच्याकाळात आवश्यक ते ज्ञान शाळेत मिळत नाही —— उच्च शिक्षण व आर्थिक दुरावस्था– संपूर्ण शिक्षणपद्धती बदलणे आवश्यक.

ब) वृक्ष – मानवाचा जिवलग मित्र.

मुद्दे:– संतांचे वृक्षारोपणाचे महत्त्व —— तुकाराम महाराजांना तर वृक्ष हे आपले सगेसोयरे वाटतात ____ विकासासाठी माणसाचे अविचाराने जंगलतोड केली. —— दुष्काळाचे प्रदुषणाचे संकट —— हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात —— वृक्ष अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवतात. —— औषधीचा वनस्पती माणसाने असाध्य आजारांवर मात केली आहे. —— असे हे वृक्ष मानवाचे जिवलग मित्र आहेत.

स) बालपण हरवते तेव्हा, माझे बालपण.

मुद्दे:– मी बालक होते आईने मला सुनावले —— आता तुमच बालपण सरल बरं का? ____ आपण मोठे झालो ही जाणीव ____ नाना बंधने आलीत —— हट्ट नाही, —— लाड नाहीत बालपणातील भाबडेपणा, निरागसपणा आता संपला —— खरोखरच हे बालपण —— सगळीकडे स्वच्छदंता असते. माझे बालपण असेच सुंदर होते —— मी ज्ञान, धन, किर्ती मिळवू शकेल —— पण हवे असलेले बालपण.